संफौ.ख.क्र.१९४/२०२३
शासन वि. शिवप्रसाद
**निशाणी क्र.१२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी शपथेवर सुरू**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- कैलास तोलाप्पा डुकरे, |
| माझे वय | :- ३३ वर्षे, |
| व्यवसाय | :- पो.शि. ब.नं. ३६४, पोलीस स्टेशन मानवत, |
| राहणार | :- मानवत, ता. मानवत, जि. परभणी. |

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

दिनांक १४/०९/२०२२ रोजी रात्री मा. पो.नि. प्रकाश राठोड यांच्या आदेशाने दिनांक १५/०९/२०२२ रोजी सी.ए. नमुना घेऊन नांदेड येथे जमा करणेकामी माझी डयुटी लावण्यात आली. त्यानुसाद दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक १५/०९/२०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता मी मुद्देमाल घेऊन नांदेड येथे रवाना झालो. त्यानंतर मी रासायनिक प्रयोगशाळा येथे नमुना मुद्देमाल जमा केला. त्यानंतर मी मानवत येथे परत आलो व जमा केलेल्या पत्राची दुय्यम प्रत तपासी अधिकारी यांच्याकडे जमा केली. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर रासायनिक प्रयोगशाळा यांची मिळाल्याची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.१३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी. एच. दशरथे यांच्यामार्फत सुरू :–**

२. दिनांक १५/०९/२०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता मी पोलीस स्टेशनला आलो होतो. दिनांक १४/०९/२०२२ रोजी मुद्देमाल माझ्या ताब्यात दिला होता. सदर मुद्देमालाची बॅच क्रमांक व उत्पादनाची तिथी मी सांगु शकत नाही. त्यादिवशी मी दोन नमुने घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.१३ वर माझी सही नाही. मी रासायनिक प्रयोगशाळा, नांदेड येथे खाजगी वाहनाने गेलो

संं.फौ.ख.क्र.१९४/२०२३
शासन वि. शिवप्रसाद
**निशाणी क्र.१२**

होतो. मी बसचे टिकीट तपास अधिकारी यांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वरीष्ठांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रृ. नि. स्वि.,
स्वाक्षरीत/-

मानवत
दिनांक: १८/०८/२०२६.

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.